**रे.दि.मु.नं. ८८/२०१७**

**निशाणी ३० खालील आदेश**

( दौलतराव यादव **विरुध्द** चंद्रकांत कुभांर)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. वादीचे मते, प्रतिवादी नं. २ हा मयत झालेला आहे. सदरचा हा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकदीकरीता दाखल केलेला असलेमुळे प्रतिवादी नं. २ चे वारसांना दावेचेकामी प्रतिवादीम्हणुन सामील करता येत नसलेमुळे प्रतिवादी नं. २ याचे दावेतुन नाव कमी करणेस परवानगी मिळावी असे कथन करुन त्याप्रमाणे दावा दुरुस्ती करणेस परवानगी मागीतलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं. १ यांनी आक्षेप घेतलेला असुन वादीचा अर्ज नामंजुर करणेबाबत विनंती केलेली आहे.

३. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने, निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. वादीचे मते, प्रतिवादी नं. २ हा मयत आहे. वादीच्या या कथनांपृष्ठर्थ वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसला तरीदेखील प्रतिवादी नं. १ यांने प्रतिवादी नं. २ हा मयत आहे ही बाब नाकारलेली नाही. वादीस त्याने दाखल केलेल्या दाव्यामध्ये कोणाविरुध्द दाद मागावयाची हे ठरविणेचा त्यांस पुर्ण अधिकार आहे. वादीचा सदरचा अर्ज मंजुर केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादीने सदरची दुरुस्ती आदेशापासुन १४ दिवसाचे आत करणेची असुन, तात्काळ दावा दुरुस्ती प्रत दाखल करणेचे आहे.

स्वाक्षरी/-

दिनांक १८/०१/२०१९

( श्रीमती. दुर्गा भ. सुतार )

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव.